*स्पीड पोस्ट*

# पुणे विद्यापीठ

## निवडणूक सूचना

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम ४०(४)(बी) अन्वये विद्यापीठ विद्यार्थी परिषद अध्यक्ष आणि सचिव पदाची निवडणूक.**

(१) शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम ४०(४)(बी) नुसार विद्यापीठ विद्यार्थी परिषदेवर अध्यक्ष आणि सचिव निवडून देण्याकरिता **परिनियम ३६६ नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

40 (4)(b) ***"The University Students' Council so formed shall elect its own President and Secretary".***

**सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील**

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख, वार व वेळ (परिनियम ३६८) | शुक्रवार, दि. २ डिसेंबर, २०११ दुपारी ४.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७. |
| २ | उमेदवारी अर्जांच्या छाननीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७१) | शुक्रवार, दि. २ डिसेंबर, २०११ सायंकाळी ४.३० वाजता | आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७. |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७०, ३७५) | सोमवार, दि. ५ डिसेंबर, २०११ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७. |
| ४ | निवडणूकीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३६६) | मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २०११ **दुपारी १२.३० ते १.०० वा. पर्यंत** | आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७. |
| ५ | मतमोजणी | मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २०११ मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच | आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७. |

**(टीप : नमूद केलेल्या वेळेतच मतदान करता येईल.)**

(२) उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करून घ्यावा आणि उमेदवारी अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १०/- (अक्षरी रुपये दहा) रोख स्वरुपात निवडणूक विभाग, पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.

(३) विद्यापीठ विद्यार्थी परिषद सदस्य मतदार यादीतील मतदारांनाच या निवडणूकीत भाग घेता येईल.

(४) संबंधित मतदार यादीतील कोणतेही दोन सदस्य मतदार, संबंधित मतदार यादीतील उमेदवारीस पात्र असलेल्या कोणत्याही सदस्यास उमेदवार म्हणून सूचित किंवा अनुमोदित करू शकतात. (परिनियम ३६७)

(५) योग्य रितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी दाखल केलेले उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील. (परिनियम ३६९)

(६) उमेदवारी अर्ज/उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या निवडणूक कक्षात फक्त हस्तपोच पध्दतीनेच स्वीकारले जातील. सदर अर्ज पोस्टाने, फॅक्स अन्यथा अन्य मार्गाने स्वीकारले जाणार नाहीत. **तसेच उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज स्वतः संबंधित उमेदवार उपस्थित असल्याशिवाय स्वीकारले जाणार नाहीत.**

(७) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर हे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३७२)

(८) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी सभेपूर्वी चार दिवस अगोदर जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३८०)

(९) ही निवडणूक प्रमाणशीर, प्रतिनिधीत्व पध्दतीनुसार, एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमाव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल.

**(१०) मतदाराने मतदानाच्या वेळी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा ते ज्या महाविद्यालयात/संस्थेत शिक्षण घेत आहेत तेथील प्राचार्य/संचालक यांनी शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठी निर्गमित केलेले ओळखपत्र किंवा सर्वसाधारण (जनरल) निवडणुकीसाठी सक्षम प्राधिका-याने दिलेले ओळखपत्र, प्राप्तीकर कार्यालयाने दिलेले पॅनकार्ड किंवा तत्सम ओळखपत्र दाखविल्याशिवाय त्यांना मतपत्रिका मिळणार नाही.**

(११) नामनिर्देशन अर्ज छाननी, मतदान आणि मतमोजणीच्या वेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील त्यांचा एक प्रतिनिधी वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर पूर्वसूचना देऊन हजर राहू शकतो. (परिनियम ३७१ व ३८२)

(१२) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४ सप्टेंबर, २००९ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली महाराष्ट्र शासन व पुणे विद्यापीठाची परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील.

(१३) मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच मतमोजणी होऊन निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येईल.

गणेशखिंड, पुणे ४११००७.
संदर्भ क्र. : पुविनि/ ४५०
दिनांक : २२ नोव्हेंबर, २०११

मा. कुलगुरू यांच्या आदेशावरुन

( डॉ. मा. ल. जाधव )
**कुलसचिव**

**सोबत :** विद्यापीठ विद्यार्थी परिषद सदस्य मतदार यादी.

**प्रत : सर्व संबंधित मतदार.**

<u>**प्रत माहिती व आवयश्यक कार्यवाहीसह :**</u>

**१. मा. वित्त व लेखा अधिकारी**
**२. मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ**
**३. सहाय्यक कुलसचिव, मा. कुलगुरू कार्यालय**
**४. सहाय्यक कुलसचिव, कुलसचिव कार्यालय**